ISSN-0976-5425

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद


# History Research Journal

Issue - XXI

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक एकविसावा





कार्यकारी संपादक

डॉ. सोमनाथ रोडे

Scanned by CamScanner

मराठवाडा इतिहास परिषद,
औरंगाबाद
(रजि.नं.एफ८२०/दि.२६.०८.१९८२)
ISSN : 0976 – 5425

# History Research Journal
# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXI** **November**
अंक – एकवीस **2016**

कार्यकारी संपादक
**डॉ. सोमनाथ रोडे**

: **संपादकीय मंडळ** :

डॉ. राजेंद्र धाये डॉ. सखाराम टकले
डॉ. ओमशिवा लिगाडे डॉ. व्यंकटेश लांब
डॉ. सौ. गीतांजली बोराडे डॉ. कालिदास सूर्यवंशी
डॉ. नितीन बावळे

या अंकात व्यक्त केलेली विचारमते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

**History Research Journal**
**इतिहास संशोधन पत्रिका**

**Issue. - XXI** **November**
अंक - एकविसावा **2016**

**ISSN : 0976 – 5425**

---

**प्रकाशक :**
**डॉ. सखाराम टकले**
सचिव, मराठवाडा इतिहास परिषद
लाल बहादुरशास्त्री महाविद्यालय, परतूर
जि. जालना. भ्रमणध्वनी - ९४२२७ ९६३५८

---

**© मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

---

**संपर्क :**
**प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे**
कार्यकारी संपादक
४- शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर
पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२- २२८०१०.
भ्रमणध्वनी : ९४२१४ ८३६११

---

**मुखपृष्ठ छायाचित्रे** - डॉ. राजाराम पिंपळपल्ले

---

**मूल्य : रु. १५०/-**
पंचवार्षिक वर्गणी रु.१०००/-
दशवार्षिक वर्गणी रु.२०००/-

---

प्रकाशन दि. २५ नोव्हेंबर २०१६

---

**अक्षर जुळवणी व मुद्रक :**
**विद्याभारती प्रकाशन**
गुजराती शाळेजवळ, मेन रोड,
लातूर- ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शीर्षक |
|---|---|---|---|
| १. | न्या. बॅ. बी. एन. देशमुख | १७ | उद्घाटकीय भाषण |
| २. | डॉ. उमेश बगाडे | १९ | बीज भाषण |
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | प्रा. संजय पाईकराव | २३ | वेरूळ लेणीतील वृक्ष पूजा |
| २. | डॉ. नितीन बावळे | २८ | भारतातील एकमेव जैन धर्मीय अतिशय क्षेत्र पंचालेश्वर |
| ३. | प्रा. राजेभाऊ साहेबराव इंझे | ३३ | वासुदेव विष्णू मिराशी यांनी 'गाथासप्तशती'ची केलेली चिकित्सा |
| ४. | डॉ. सुलभा मुरलीधर | ३९ | प्राचीन महाराष्ट्रातील विणकाम कला - एक आढावा |
| | **गोषवारा** | | |
| १. | श्री. सदानंद नरसू गावडे | ४३ | शंकराचार्य करवीरपीठ, संकेश्वर |
| २. | श्री. समुद्रगुप्त पाटील | ४४ | तेलंगाणा प्रांतातील मॅगॉलिथिक सिव्हिलायझेशन एक अभ्यास |
| ३. | श्रीमती कल्पना राठोड | ४५ | बंजारा संस्कृती व आदिधर्म संकल्पना |
| | **मध्ययुगीन विभाग** | | |
| १. | Shri. Anil Kumar | ४९ | Post Panipat Maratha Policies : A Case Study of Re-emergency of Maratha Power in Hindustan |
| २. | Dr. Abdullah Chaoush | ५९ | Malik Ambar : Architect of Aurangabad City |
| ३. | डॉ. ओमशिवा लिगाडे | ६५ | मुस्लिम कालगणना पद्धती |
| ४. | डॉ.विवेकानंद चव्हाण | ७१ | माहूर येथील जगापूर ताम्रपटाचे ऐतिहासिक महत्त्व |
| ५. | डॉ. रमेश धनराज जाधव | ७६ | नागपूरकर भोसल्यांच्या काळातील मनोरंजन |
| ६. | श्री. भूषण महाजन | ८१ | राणापुंजा भिल्ल : एक अभ्यास |
| ७. | श्री. दीपक शिरसाट | ८४ | शिवाजी व शिवकाळावरील इतिहासाचे भाष्यकार |


Scanned by CamScanner

७

# शिवाजी व शिवकाळावरील इतिहासाचे भाष्यकार

दिपक बाबूलाल शिरसाट
मु. पो. गोद्रेगाव, ता. जामनेर, जि. जळगाव

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य हे जनतेच्या कल्याणासाठी होते. छत्रपती हे नाव त्यांच्या हयातीत ख्यातमान झाले होते.[१] याची ग्वाही आपणास पाश्चात्य शिवचरित्रकारांच्या साधनावरुन कळून येते. मराठ्यांच्या पराक्रमाची कीर्ती भारताबाहेरील जगाला होण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे असामान्य धैर्य, साहस आणि मुत्सद्देगिरी याची ख्याती यूरोप खंडात सर्वत्र पसरली होती.[२] याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे १८ व्याशतकात अनेक इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इटालियन लोकांनी शिवाजीच्या चरित्राचे असामान्य घटकांची नोंद घेणारे अनेक लहान-मोठे चरित्रग्रंथ त्यांच्या हयातीत लिहिले. अफजल खानाच्या वधानंतर राजापूर येथे इंग्रज वखारीतील अधिकाऱ्यांनी सुरत येथील आपल्या वरिष्ठांना लिहिले. Sevagy a great Rashpoo.[३]

तत्कालीन काळात लिहून ठेवलेले चरित्रविषयक वाङ्मय महत्त्वाचे ठरतात. फ्रायर सारखे प्रवासी वैद्यकीय पदवीधर होते. बर्निअर आणि डेलॉन हे यांचा व्यवसायातील ख्यातनाम होते. शिवछत्रपतींचे संपूर्ण असे चरित्र लिहण्याचा मान पाश्चत्य लेखकांपैकी कॉस्मो-द-गॉर्दा यांच्याकडे जाते.[४] हे चरित्र त्यांनी पोर्तुगीज भाषेत लिहिले व लेखन समयी त्याचा मुक्काम मार्मागोवा येथे होता. गार्दा हा शिवाजीचा पूर्व अभिमानी आणि पश्चिम भारतीयातील रीतीरिवाज पूर्णपणे जाणणारा होता. त्याने आपले शिवचरित्र शिवचरित्रकार कृष्णाजी अनंत सभासद याच्या चरित्रापूर्वी एक वर्ष अगोदर म्हणजे १६९५ मध्ये लिहिले. ते लिस्वबन मध्ये इ. स. १७३० मध्ये छापण्यात आले. त्याची १६८ पृष्ठे आहेत ते डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर यांच्या संग्राहलयात आहे.[५] ते १७३० ते लिस्वनमध्ये इ. स. १७३० मध्ये शतकात आले. त्यानी १६८० ते १७३० पर्यंत अज्ञात होते. पोर्तुगीज जनता आणि राजकारणीय हे जाणून घेण्यास उत्सुक होते. त्याना माहिती १५,१६ पृष्ठांच्या पुस्तकांद्वारे पुरविली जात असे. अॅन्टोनिमो कार्डिम फ्रोस याने ५ जानेवारी १७३३ रोजी काऊंट ऑफ उन्हाव याला लिहिलेला एका पत्रात शिवाजींचे चरित्र आवर्जून वाचण्याची शिफारस केली आहे. सदर पत्र हे शिवचरित्र म्हणजे गार्दाने लिहिले आहे. चरित्र असावे यात शंका नाही.[६] गार्दाचे शिवचरित्र अपुरे आणि अविश्वसनीय माहितीने भरलेले असले तरी शिवचरित्रातील एक टप्पा म्हणून त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. रोमन कॅथालिक असल्यामुळे शिवाजीला परलोकात गती मिळणार नाही असे आचरट विधान त्याच्या ग्रंथात आहे.[७] आपल्या दीडशे पृष्ठांच्या पुस्तकात शिवाजीचा जन्म विरार येथे झाला असे लिहितो. मराठ्याने पोर्तुगीज यांच्यामध्ये मार्मागोवा येथे झालेल्या आरमारी युध्दाचा वृत्तान्त इतिहासात प्रथम गार्दाने आपल्या चरित्रात दिला.

१७ व्या शतकात अनेक फ्रेंच प्रवासी, साहसी व्यक्ती आणि डॉक्टर यांनी भरताला भेट दिली. थेवेनॉटने आपल्या परीने शिवाजीचे छोटेसे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.[८]

बार्थोलोक कॅरे हा फ्रेंच प्रवासी १६६८ मध्ये भारतात सुरतला येऊन दाखल झाला. त्याच्या प्रवासवर्णनाचे दोन भाग पडतात. शिवाजींचा चाहता होता. प्रवास वर्णनात छोटेसे शिव चरित्र लिहिले. पहिल्या प्रवासात त्याला शिवाजींबद्दल मिळालेली माहिती तो नमूद करतो. शाहिस्तेखानावरील हल्ला, सुरत हल्ला, जयसिंग मोहीम, आग्रावरुन सुटका, दुसरा सुरत हल्ला या घटना कालानुक्रमाने वर्णिलिलेल्या आहेत. शिवचारित्राच्या दुसऱ्या भागात त्याने शिवाजी राजावर स्तुतिसुमने उधळलेली आहे.

फ्रन्काईस मार्टिन हा पॅरिस मधील भुसार मालाचा व्यापाऱ्याचा अनौरस मुलगा भारतात आला.[१०] १६६५ ते १६७० ला सुरतला आला. त्याने आपली दैनंदिनी लिहुन ठेवली आहे. त्याच्या दैनंदिनीत त्याच्या कर्नाटक मोहिमेची बरीच साधार माहिती मिळते. कर्नाटक मोहिमेचे विस्तृत वर्णन देवून प्रत्यक्षात पाहिलेल्या छावणीचे वर्णन त्याने केलेले आहे. हेन्री ऑक्झिडेन इंग्रज वकील १९ मे रोजी रायगडावर आला. राज्यभिषेका प्रसंगी काय घडले याची बारीक सारिक नोंद त्याने ठेवली आहे. तो फक्त तुलादान विधीचा उल्लेख करतो.[११]

ग्रँट डफ हा स्कॉटीश, स्कॉटलॅंडचा रहिवासी होता.[१२] पुणे-सातारा हा परिसर त्याला स्कॉटलॅंड सारखा वाटायचा या ठिकाणी असलेल्या दऱ्या खोऱ्या भौगोलिक परिसर किल्ले हे त्याला मायभूमीची ओळख करुन देत. पॉलिटिकल ऐजंट म्हणून ग्रॅंटची नेमणुक साताऱ्यात झाली. तो साताऱ्याच्या कारभार ईस्ट इंडिया कंपनीच्या मदतिने पाहत असे.[१३] डफची कार्यनिष्ठा श्रम, धाडस आणि चिकाटीमुळेच डफला यश मिळत गेले. मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून बखर साहित्याच्या वापर डफ ने केला. डफ स्वत: कंपनीचा अधिकारी व लष्करात होता. डफने खाजगी कागदपत्रे उदा. चिटणीस, देशमुख, देशपांडे घराण्याकडे असणाऱ्या कागदपत्रांचा वापर केला. कागदपत्रे इतिहासाची अव्वल साधने होत. याची डफला पुर्ण कल्पना होती.[१४] म्हणून डफने इ.स. १०००


ISSN : 0976 – 5425
Scanned by CamScanner

पासूनचा दक्षिण भारताचा इतिहास आपल्या ग्रंथात मांडला. डफने लिहिलेल्या ग्रंथाचे नाव Down fall of the Mugal and the Rise of Maratha असावे, असे अनेकांनी सुचविले परंतु जेम्स मॅकिनटॉशमार्फत लॉंगमन कंपनीतर्फे History of the Maratha या नावाने डफने ग्रंथ प्रकाशित केला. ग्रँट डफने ग्रंथात तत्कालीन भौगोलिक परिस्थिती सामाजिक, राजकीय परिस्थिती छ.शिवाजी महाराजांच्या मोहिमा इ. उल्लेख केला आहे. ग्रंथात यूरोपीयन वाचकांसमोर ठेवून लिखाण केले आहे. ग्रंथात मांडलेली विधाने महाराष्ट्रातील परिस्थिती छ. शिवाजी महाराजांच्या घराण्याची कामगिरीला महत्त्व नोंदविलेले आहे. ठराविक प्रकरण समोर ठेवून लिखाण केले आहे. इंग्रजांना पूरक असलेला इतिहास लिहिला आहे. तो ब्रिटिशांच्या हेतूने लिहिला आहे. डफच्या लिखाणातून तत्कालीन राज्याकारभाराची परिस्थिती कळते. एकांगी इतिहासाला प्रत्युत्तर म्हणून मराठ्यांच्या इतिहासाचे लिखाण पुढे भारतीय इतिहासकारांनी लिहिले.

न्यायमूर्ती रानड्यांनी ग्रँट डफच्या लिखाणावर आरोप केलेला आहे. आरोपांचे खंडन करून मराठ्यांच्या इतिहासाचे राष्ट्रीय पातळीवर महत्त्व विशद केले. रानडे यांची वृत्ती विदग्ध होती.[१५] त्यांच्या विवेचनाचा भर विश्लेषणावर होता. न्या. तेलंग यांच्या सहकार्याने मराठ्यांचा इतिहास लिहावा, अशी त्यांची योजना होती. मराठा सत्तेचा उदय हा त्यांचा ग्रंथ महत्त्वाचा आहे. त्यांची पहिली आवृत्ती इ. स. १९०० प्रसिध्द झाली.[१६] त्यांच्या मनांमध्ये भारतीयांविषयी तळमळ आणि त्यांची राष्ट्रीय उन्नती व्हावी, असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मनात सतत दोन प्रश्न घोळत होते. हिंदुस्थानाच्या अंध:पतनास जबाबदार कोण? हिंदुस्थानी माणसाला आपल्या पायावर उभे राहता येईल का ? या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेण्यामागून मराठी सत्तेचा उत्कर्ष हा ग्रंथ आकारास आला.[१७] त्यासाठी त्यांनी ग्रँट डफच्या इतिहासाचा अभ्यास केला त्याने मांडलेला वणवा सिद्धांत खोडून टाकला. भारतीय दृष्टिकोनातून इतिहासाचे सत्य स्वरुप व मर्म लोकांसमोर मांडणे ही त्यांची इतिहास लेखनामागील प्रमुख भूमिका होती.[१८]

इतिहासाचार्य वि. का. राजवाड्यांना रानड्यांनी केलेली मराठी संत व मार्टिन ल्युथर यांची तुलना मान्य नाही. राजवाड्यांच्या मते रामदास स्वामींनी मांडलेली महाराष्ट्र धर्माची कल्पना ही रानड्यांच्या धार्मिक पुनरुज्जीवनापेक्षा वेगळी होती.[१९] राजवाड्यांनी सर्वप्रथम 'कोल्हापुर समर्थ' या वृत्तपत्रातून काही लेख प्रसिध्द केले. ग्रंथमालामधूनही लेखन प्रारंभ केले. त्यानंतर त्यांनी मूळ नोंदीवरून चिरस्मरणीय अशा ऐतिहासिक सामग्रीचे लेखमाला मराठ्यांच्या इतिहासाच्या साधने या नावाने प्रसिध्द करण्याचे कामही हाती घेतले. इ. स. १८९८ ते १९२१ या काळात त्यांनी अत्यंत परिश्रमाने या मालेतून २२ खंड प्रसिध्द केले. राजवाड्यांनी मराठ्यांच्या इतिहासाला राष्ट्रीय पातळीवर स्थान देऊन त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलविला. त्यांच्या मते पाश्चिमात्त्यांनी लिहिलेला इतिहास एकांगी स्वरूपाचा आहे.[२०] इतिहासाची अस्सल साधने उजेडात आणून साधन सामुग्रीच्या आधारे लेखन ही राजवाड्यांची आग्रही भूमिका होती. अखंड परिश्रम आणि परिभ्रमण करून कागदपत्रे मिळवणे, त्यांची छाननी करून ती प्रसिध्द करून यासाठी त्यांनी जीवन समर्पण केल्याचे दिसून येते. ते प्रखर राष्ट्रवादी होते. राजवाड्याचे टीकाकार म्हणतात की, त्यांना मराठ्यांचा संपूर्ण इतिहास लिहिता आला नाही.[२१] यामध्ये काही प्रमाणात तथ्य असले तरी त्यांना त्यासाठी आवश्यक असणारी साधने मिळाली नाहीत हेही तितकेच खरे आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत कठीण कार्य केले हे पाहिले म्हणजे त्यांच्या कार्याचे महत्त्व समजते. जोपर्यंत त्याचे लिखाण जिवंत आहे आणि वाचकांकडून वाचले जात आहे तोपर्यंत तरुण पिढीला त्यांचे हे गुण स्फूर्ती देत राहतील यात मुळीच शंका नाही.

सर जदुनाथ सरकार मध्ययुगीन भारताचे एक श्रेष्ठ इतिहासकार म्हणून जगभर ख्यातकीर्त आहे. इ. सन १६०० ते १८०० हा त्यांच्या जिव्हाळ्यांचा विषय.[२२] त्यांनी २७ ग्रंथसंपदा व हिंदुस्थान स्टॅंडर्ड या कलकत्ता येथील साप्ताहिकात उपलेख लिहिले. या प्रचंड लिखाणाचा परामर्श घेणे अवघड आहे. पैकी Shivaji and his times हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ होय. या ग्रंथात शिवकाळातील परिस्थितीचे व औरंगजेबाच्या कर्तृत्वाचे वर्णन केले होते. डॉ. श्रीवास्तव यांच्या मते जदुनाथ सरकार हे समकालीन इतिहासातील जागतिक स्तरावरील श्रेष्ठ इतिहासकार होते.[२३] महाराष्ट्रावर व मराठ्यांच्या इतिहासावर जदुनाथांचे निरास्थित प्रेम होते. महाराष्ट्र हे माझे दुसरे घर आहे, असे ते म्हणत असत. महाराष्ट्रात मी ४० भेटी दिल्या आहेत. त्यांच्या डोंगर दऱ्यांतून व गडावरून भटकलो आहे. सगळीकडे माझी मित्रमंडळी निर्माण झाली, असे त्यांचे महाराष्ट्राशी अतूट नाते होते.[२४]

गोविंद सखाराम सरदेसाई महाराष्ट्राला दिलेले श्रेष्ठ इतिहासकार त्यांना रियासतकार म्हणून ओळखतात. बडोदा येथे असताना सरदेसाईंनी मॅकॅव्हॅलीच्या प्रिन्सचा राजपुत्र व सिलीच्या इंग्लड देशाचा विस्तार या ग्रंथाचे भाषांतर करून वाङ्मयविश्वात प्रवेश केला.[२५] त्यांना राजपुत्रांना शिकविण्याचे कामही करावे लागले. राजपुत्रांना शिकविण्यासाठी प्रथम मराठीतून इतिहास लिहून काढला. इतिहासामध्ये घातलेली भर म्हणजे रियासती होय. आपल्या शककर्ता शिवाजी या ग्रंथामध्ये ते शिवाजीची तुलना अलेक्झांडर, सिझर, नेपोलियन, बाबर, अल्फ्रेड इ. ऐतिहासिक व्यक्तीशी करतात. या तुलनात्मक विवेचनातून शिवाजींचे योग्य मूल्यमापन झाले नाही.[२६] उग्रप्रकृती या ग्रंथामध्ये त्यांनी संभाजीची योग्यता सांगताना टाळाटाळ केलेली आहे.[२७] हीच गोष्ट शाहू, राजाराम, नाना



Scanned by CamScanner

फडणवीस व महादजी शिंदे याबाबत दिसून येते. परंतु त्यांच्या निधनानंतर रियासतीमध्ये पुनर्मुद्रण व रियासतीमध्ये संहिता कायम ठेवून नवे संदर्भ या शीर्षकाखाली स्वतंत्रपणे देऊन रियासतींच्या लेखनात अधिक परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न केला. मराठा इतिहासाविषयी पाश्चात्य लेखकांनी ज्या चुकीच्या कल्पना मांडलेल्या आहेत त्या नाहीशा करण्याचे आपले ध्येय त्यांनी स्पष्ट केले. त्यांची ७ व्याख्याने Main Currents of Maratha History या शीर्षकाखाली ग्रंथ रूपाने प्रसिध्द करण्यात आली. The new History of the Marathas हा ग्रंथ लिहिण्याचे कार्यही त्यांनी हाती घेतले. या इंग्रजी ग्रंथात मराठी रियासतीच्या ८ खंडांचा तीन भागांत संक्षेप करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक संशोधन क्षेत्रात सेतु माधवराव पगडी यांचे एक महत्त्वाचे योगदान आहे. त्यांच्या कर्तृत्वाची हयात महाराष्ट्राबाहेर घालवूनही महाराष्ट्राच्या कुलदैवतांची, मराठ्यांच्या शौर्याची आणि महाराष्ट्राच्या सद्यस्थितीची त्यांनीच महाराष्ट्रीयांना खरी ओळख करून दिली.[२८] छत्रपतींवरील त्यांच्या अभ्यासाने मराठ्यांच्या इतिहासाचे गैरसमजुतीचे अनेक भोपळे जाहीरपणे फुटले आहेत.[२९] उदा. शिवाजींची जन्मतिथी, कल्याणच्या सुनेचे प्रकरण, बाबाजी निंबाळकर प्रकरण वगैरे यासाठी त्यांनी शिवाजींवरील सर्व उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित वाङ्मय अभ्यासले.[३०] शिवचरित्र : एक अभ्यास (१९७१) छत्रपती शिवाजी (१९७४), छत्रपतींनि त्यांची प्रभावळ १९७६, स्टडीज इन मराठा हिस्ट्री भाग २ (१९७१) श्री. समर्थ आणि संप्रदाय (१९८५) हे त्यांचे शिवाजी व शिवकाळावरील गाजलेले ग्रंथ होत.[३१]

मराठ्यांच्या इतिहासात महत्त्वाचे योगदान देणारे ग. ह. खरे ऊर्फ तात्यासाहेब यांचे जीवन पूर्णतः एकांगी ब्रह्मचर्याचे होते. अभ्यासकांच्या मालिकेत प्रदीर्घ, निरलस या व्यासंगाने शोभणारे आणि इतिहास संशोधनाला सबंध जीवन त्यांनी वाहून घेतले.[३२] गेल्या ५० वर्षांच्या काळात इतिहासातील विविध विषयांवर त्यांनी ५८ इंग्रजी, मराठी, हिंदी ग्रंथ, ४५० हून अधिक लेख लिहिले आहे.[३३] त्यांपैकी २३ लहान-मोठे ग्रंथ व ६० लेख प्रसिध्द झाले आहेत. २६ ग्रंथ केवळ वैयक्तिक जबाबदारीवर त्यांनी प्रकाशित केले आहेत. ९ इतरांनी प्रकाशित केले आहेत. प्रत्यक्ष ज्ञान असावे म्हणून त्यांनी सिंध व पूर्व बंगाल सोडून सर्व भारतभर प्रवास केला होता. मूर्ती विज्ञान, संशोधकाचा मित्र भाग १, महाराष्ट्राची ४ दैवते ही ३ पुस्तके अतिशय महत्त्वाची आहे. या प्रत्येकास ५०० रुपयांची बक्षिसे मिळालेली आहेत. संशोधकाचा मित्र भाग १ ला मराठा इतिहासाठी शिवकालीन पत्रसार संग्रह खंड १ व २ शिवचरित्र, इतिहासकर्ते मराठे, शिव चरित्र संशोधन वृत्त इ. त्यांच्या ग्रंथसंपदा महत्त्वाच्या होत.



**निष्कर्ष :**

शिवकालीन इतिहास हा मध्ययुगीन भारताच्या इतिहासात विशेषतः मराठा इतिहासातील महत्त्वाचा घटक होय. शिवकाळात अनेक परकीय प्रवासी महाराष्ट्रात आले. १८ व्या शतकात पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज आणि इटालियन इ. परकीय प्रवाशांनी तत्कालीन परिस्थितीची असामान्य घटकांची नोंद घेतली. त्यांच्या नोंदीतून शिवचरित्रावर प्रकाश पडेल. शिवकालीन इतिहासासाठी इतिहासाच्या भाष्यकारांना आपल्या प्रवास वर्णनातून, लिखाणातून महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यात परकीय व इतदेशीय भाष्यकारांची महत्त्वाची भूमिका होती. भाष्यकारांच्या लिखाणातून तत्कालीन सामाजिक, धार्मिक, व राजकीय परिस्थिती कळते. भाष्यकारांच्या दृष्टिकोनेही कळतो. कास्मा-द-गार्दा या पोर्तुगीज लेखकांचे शिवचरित्र हे कृष्णाजी अनंत सभासद यांच्या सभासद बखर अगोदर म्हणजे इ. स. १६९५ मध्ये लिहिले. आजही ते गोव्याच्या पिसुर्लेकर म्युझियममध्ये आहे. त्याचा वापर पोर्तुगालमध्ये पोर्तुगीज जनता व राजकारणी छत्रपती शिवाजीच्या राजनीतीचा कारभार जाणून घेण्यासाठी करीत.

**संदर्भ**

१. शिवमुद्रा :- (छ.शिवाजी महाराज त्रिव संवत्सरिक राज्यरोहण समारोह) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन द्वितीय आवृत्ती १९७५ पृ. ४१.
२. कित्ता
३. कित्ता
४. कित्ता
५. कित्ता
६. कित्ता
७. कित्ता
८. कित्ता पृ. ४४
९. कित्ता
१०. कित्ता पृ. ४६
११. बेंद्रे वा.सी.; 'श्री शिव छ.शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र' (उत्तरार्ध) पार्श्व पब्लिकेशन कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती २०१३ पृ. १३३.
१२. कुलकर्णी अ.रा, जेम्स कनिंगहॅम ग्रँड डफ. कै.न.ची. केळकर स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ, पुणे प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९६९ पृ. २३.
१३. त्रैमासिक, इतिहास शिक्षक, एप्रिल मे २००४, पृ. ८
१४. कित्ता, पृ. १३५.
१५. कुंभार नागोराव (संपा.) 'न्या. महादेव गोविंद रानडे', प्रबोधन प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती १९९३ पृ. ३४.
१६. कित्ता

१७. मोरवंचीकर रा.श्री. 'इतिहास लेखन शास्त्र व इतिहासकार', विद्या बुक पब्लिशर्स, औरं
प्रथम आवृत्ती, १९९९ पृ. १६४.
१८. कित्ता
१९. गायकवाड आर.डी. 'इतिहास लेखनशास्त्र', फडके बुक सेलर्स कोल्हापूर, तृतीया आ
१९९० पृ. ३७६.
२०. कित्ता
२१. कित्ता पृ. १७५
२२. कित्ता
२३. कित्ता पृ. १८४
२४. कित्ता
२५. गायकवाड, पूर्वोक्त पृ. ३९९
२६. कित्ता पृ. ४००
२७. कित्ता पृ. ४०१
२८. कित्ता
२९. मोरवंचीकर, पूर्वोक्त
३०. कित्ता
३१. कित्ता
३२. गायकवाड, पूर्वोक्त पृ. ४१५
३३. कित्ता

००

"राजकारण हे माझ्या जीवनाचे निकृष्ट अंग आहे, व ते तात्पुरते आहे. शाश्वत मूल्यांचे माझ्या ठायी काही असेल तर ते म्हणजे सत्य, अहिंसा व ब्रह्मचर्य या विषयीचा माझा आग्रह होय. तोच माझ्या जीवनाचा सत्यांश होय."

– महात्मा गांधी


ISSN : 0976 – 5425

Scanned by CamScanner